# प्रेसनोट

दि.०८/०२/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | डॉ.वृषाली तुळशीराम सुर्यवंशी–कोरडे, वय–३९ वर्ष, वैद्यकीय अधिकारी, वर्ग–२ (गट अ), प्राथमिक आरोग्य केंद्र, बारागांव नांदूर, ता.राहुरी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार या समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून नोकरीस असून, त्यांचा माहे ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यांचा कामावर आधारित मोबदला व प्रोत्साहन भत्ता व ऑक्टोबर महिन्याचा प्रोत्साहन भत्ता मिळणेकरीता तक्रारदार यांनी यातील आरोपी लोकसेविका डॉ.वृषाली तुळशीराम सुर्यवंशी–कोरडे,वैद्यकीय अधिकारी, वर्ग–२ (गट अ), प्राथमिक आरोग्य केंद्र, बारागांव नांदूर, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांची दोन महिन्यांपूर्वी भेट घेऊन विचारणा केली असता, त्यांनी तुला मिळणारे रक्कमेच्या निम्मी रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यानंतर मागील एक महिन्यापूर्वी तक्रारदार या पुन्हा आरोपी लोकसेविका यांना भेटल्या असता त्यांनी आता काहीतरी रक्कम दे तरच मी तुझे बिलासंबधी पुढील प्रोसेस करेन असे सांगितलेने तक्रारदार यांनी नाईलाजाने जवळ असलेले रु.४५००/– त्यांना दिले. त्यानंतर दि.०३/०२/२०२३ रोजी तक्रारदार यांनी पुन्हा आरोपी लोकसेविका डॉ.वृषाली तुळशीराम सुर्यवंशी–कोरडे यांची भेट घेऊन बिला संदर्भात विचारणा केली असता पुन्हा बिलाचे निम्मे रकमेची मागणी केली व तडजोड अंती रु.१०,०००/– तरी दयावे लागतील असे सांगितले. तक्रारदार यांना आरोपी लोकसेविका डॉ.सुर्यवंशी–कोरडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क केला. दि.०६/०२/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेविका डॉ.वृषाली तुळशीराम सुर्यवंशी–कोरडे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१०,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.०८/०२/२०२३ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, बारागांव नांदुर येथे लाचेचा सापळा आयोजित केला असता, आरोपी लोकसेविका डॉ.वृषाली तुळशीराम सुर्यवंशी–कोरडे यांनी त्यांचे केबीन मध्ये तक्रारदार यांचेकडुन रु.१०,०००/– लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदर बाबत राहुरी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.**


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००


(हरीष खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर